Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – III October 2014

# महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना

**गोपीनाथ दिनकर खरात,**
**सहयोगी प्राध्यापक,**
**महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे**
**लोकनेते व्यंकटराव हिरे कला,**
**विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक.**

## प्रस्तावना

आदिवासी हा शब्द टोळी करून राहणारी जमात (Tribe) यावरून प्रचलित झालेला आहे. जगात दक्षिण आफ्रिकेनंतर भारताचा आदिवासींसंदर्भात क्रमांक लागतो. जगातील आदिवासी लोकसंख्या 370 दशलक्ष असून एकूण जागतिक लोकसंख्येशी तिचे प्रमाण 6 टक्के आहे. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमाती या संकल्पनेचा प्रथम उल्लेख झालेला असून राज्यघटना कलम 366(25) अनुसार अनुसूचित जमातीची व्याख्या करण्यात आलेली आहे. "भारतातील अशा जमाती किंवा समुदाय किंवा जमातींचा भाग अथवा समूहाचा भाग ज्याचा समावेश उपरोक्त घटना कलमानुसार अनुसूचित जमातीच्या यादीत करण्यात आलेला आहे त्यांना अनुसूचित जमाती असे म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विशिष्ट जमात किंवा समूहाचे यथार्थ स्पष्टीकरण मिळण्याच्या दृष्टीने मूळ निवासी, आदिवासी, वनवासी याऐवजी 'अनुसूचित जमात' हा शब्दप्रयोग योग्य असल्याचे समर्थन केले व घटनेनुसार हाच शब्दप्रयोग मान्यताप्राप्त झालेला आहे. अर्थात शासकीय स्तरावरुन तसेच जनसामान्यांमध्ये 'आदिवासी' हा शब्दप्रयोग प्रचलित झालेला असून त्याचा सर्रास वापर केला जात असल्याचे आढळून येते.

## आदिवासी लोकसंख्या

भारतातील आदिवासी जमातींचा संख्या शासकीय आकडेवारीनुसार सुमारे 700 आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासी लोकसंख्या 104.28 दक्षलक्ष आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 8.6% आहे. भारतातील एकूण आदिम समूह 75 आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या 2011 जनगणनेनुसार 10,510,213 आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येचे शे. प्र. 9.09 आहे. विशेषतः महाराष्ट्रात कायदेशीर फेरबदलानुसार सध्या एकूण 45 अनुसूचित जमाती आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्हयाची एकूण

लोकसंख्या 61,07,187 असून त्यापैकी आदिवासी लोकसंख्या 15,64,369 आहे. नाशिक जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्या 24.60% आहे. महाराष्ट्रातील आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र'राज्य आदिवासी सहकारी विकास महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ या प्रमुख संस्था नाशिक येथे असल्याने प्रशासकीयदृष्टया नाशिकचे महत्त्व आहे.

**भारतातील आदिवासी उपयोजना**

भारताची आर्थिक महासत्ता म्हणून वाटचाल सुरु असताना विकासाला मानवी चेहरा देण्याच्या प्रक्रियेत आदिवासी संरक्षण व विकासाला प्राधान्य मिळण्याची गरज आहे. आदिवासी विकासासंदर्भात दुबे समिती आणि नियोजन आयोगाच्या कृतीदल शिफारशींनुसार पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून जो नवा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला त्याला 'आदिवासा उपयोजना' असे म्हणतात. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा व मिनी माडा प्रकल्प, अतिरिक्त आदिवासी उपयोजना आणि आदिम समूह हे आदिवासी उपयोजना संरचनेचे मुख्य घटक आहेत. भारतात सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून माडा व मिनी माडा पॅाकेटसची सुरुवात झालेली आहे. सध्या भारतातील 22 राज्ये व 2 केंद्रशासित प्रदेशात आदिवासी उपयोजना लागू आहे. भारतातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांची संख्या 192 असून माडा व मिनी माडा पॅाकेटसची संख्या अनुकमे 259 व 82 इतकी आहे. देशातील 75 आदिम समूहांना आदिवासी उपयोजना लागू आहे.

''आदिवासी व्यवहार मंत्रालय'' या स्वतंत्र खात्याची निर्मिती ऑक्टोंबर 1999 पासून करण्यात आली आहे. भारतातील आदिवासी विकास आणि कल्याणाच्या दृष्टीने कार्य करणारे हे मंत्रालय सर्वाच्च संस्था आहे. केद्रशासनाच्या आदिवासी विकास योजनांची राबवणूक या मंत्रालयाद्वारे केली जाते. आदिवासी व्यवहार मंत्रालयद्वारे राज्यांना आदिवासी उपयोजनेसाठी वाढीव भाग म्हणून केंद्राचे विशेष अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. आदिवासी विकासविषयक प्रशासकीय यंत्रणा, आदिवासी क्षेत्र आणि आदिवासी विकास योजना यांच्या संनियंत्रण आणि मूल्यमापनाची जबाबदारी घटनेच्या कलम 244 (1) अनुसार केंद्रशासनावर सोपविण्यात आली आहे. भारतीय राज्येघटनेच्या 5 व्या परिशिष्टानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांसाठी राज्यपालांचे अहवाल आणि आदिवासी सल्लागार परिषदेच्या शिफारशी अशी तरतूद करण्यात आली आहे.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – III October 2014

**महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना**

महाराष्ट्रा राज्याची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्रफळ 3,07,713 चौ. कि. मी. आहे. भारतातील औदयोगिकदृष्टया प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख केला जातो. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून देशाची आर्थिक राजधानी आहे. महाराष्ट्रात एकूण 35 जिल्हे असून सर्वत्र आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. महाराष्ट्रातील अनूसूचित जमातींची संख्या 45 असून त्यापैकी बहुसंख्या प्रामुख्याने 15 जिल्हयांमध्ये केंद्रीत आहेत. लोकसंख्येचा विचार करता भिल्ल, गोंड, महादेव कोळी, वारली, कोकणा,ठाकर, आंध, कोरकू, ढोर कोळी, पारधी या महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती आहेत. शासन निर्धारित मागासलेपणाच्या निकषानुसार महाराष्ट्रातील कातकरी, कोलाम आणि माडिया गोंड या तीन आदिम जमाती म्हणून जाहीर करण्यात आलेल्या आहेत. भारतीय राज्यघटनेतील कलम 46 अनुसार आदिमासीविषयक तरतुदींच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून राज्य शासनाद्वारे आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भूमिका बजावली जात आहे.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या आर्थिक व समाजिक प्रगती आणि जीवनमान वृध्दीच्या दृष्टीने प्रचलित आदिवासी उपयोजनेची अंमलबजवाणी 1975-76 पासून होत आहे. राज्याच्या विकास योजनेचाच स्वतंत्र भाग म्हणून आदिवासी उपायोजनेचा उल्लेख केला जातो. प्रारंभी आदिवासी उपयोजनेची संकल्पना 'क्षेत्र विकासावर' आधारित होती. 1986 पासून क्षेत्र विकासाऐवजी "आदिवासी कुटंबांचा विकास" हा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे. राज्यातील आदिवासी उपयोजना आणि उपयोजनेबाहेरील सर्व आदिवासींना विकास संधी मिळाव्यात यादृष्टीने आदिवासी उपयोजनेच्या कार्यकक्षेत वाढ करण्यात आली आहे. सध्या आदिवासींचा क्षेत्रीय, कौटुंबिक आणि वैयक्तिक विकास अशा समन्वयातून आदिवासी उपयोजनेची अंमलबजावणी केली जात आहे. महाराष्ट्रात सुकथनकर उपसमितीच्या शिफारशीनुसार आदिवासी उपयोजनेच्या नियोजनाची जबाबदारी 1993-94 पासून आदिवासी विकास विभागावर सोपविण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनेची उद्दिष्टे**

महाराष्ट्रात आदिवासी आणि बिगर आदिवासी यांच्यातील आर्थिक व मनुष्यबळ विकासाची तुलना करता फार मोठे अंतर निदर्शनास आले. विकासातील हे अंतर भरुन काढण्यासाठी आदिवासी

उपयोजनेची अंमलबजावणी खालील उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या दृष्टीने केली जात आहे.

1) राज्यातील आदिवासी क्षेत्रे व इतर क्षेत्रे यांच्या विकासातील अंतर भरुन काढणे.

2) आदिवासींच्या रहाणीमानाचा दर्जा सुधारणे.

3) आदिवासींना भेडसावणा-या प्रमुख समस्यांचे निराकरण करणे.

4) आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक विकास प्रकियेला गती देणे.

**महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनेची संरचना**

महाराष्ट्रातील आदिवासींचा उपयोजना क्षेत्रात जास्तीत जास्त सहभाग असावा यादृष्टीने व्यापक संरचना स्वीकारण्यात आलेली आहे. आदिवासी विकासविषयक सर्व योजनांचा लाभ आदिवासींना मिळावा म्हणून उपयोजनाविषक निकष शिथिल करुन व्यापकता वाढवण्यात आली आहे.

**आदिवासी उपयोजनेचे संवर्ग -**

1) **'एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प'** (ITDP-Integrated Tribal Development Project)

महाराष्ट्रात वरील निकषांनुसार उपयोजना क्षेत्र निर्धारित करण्यात आले आहे ज्याचा उल्लेख ''एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प'' असा केला जातो. सध्या महाराष्ट्रात 24 एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यरत आहेत.

2) **सुधारित क्षेत्र विकास पध्दती** (MADA-Modified Area Development Approach)

महाराष्ट्रात 1975-76 पासून आदिवासी उपयोजना सुरु झाल्यानंतर प्रत्यक्षात ताठर निकषांमुळे निम्म्यापेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या उपयोजना क्षेत्राबाहेर राहिली. शासनाने अधिकाधिक आदिवासींना उपयोजना क्षेत्रात आणण्याच्या दृष्टीने निकष शिथिल केले. या नवीन धोरणानुसार आदिवासींचे सलग ग्राम समूह/खंड शोधून काढण्यात आले ज्यांना ''सुधारित क्षेत्र विकास पध्दती'' किंवा ''माडा पॉकेट्स'' असे म्हणतात. महाराष्ट्रातील माडा प्रकल्पांची संख्या 44 आहे.

3) **लघू सुधारित क्षेत्र विकास पध्दती** (MINIMADA)

आदिवासी विकासविषयक नियोजन अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने आदिवासी गावसमूहांची लोकसंख्या मर्यादा 10,000 वरुन 5,000 अशी कमी करण्यात आली. ज्याला ''लघू सुधारित क्षेत्र विकास

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – III October 2014

पध्दती / मिनी माडा क्षेत्र '' असे म्हणतात. सध्या राज्यातील मिनीमाडा प्रकल्प 24 आहेत.

4) **अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र** (ATSP-Additional Tribal Sub-Plan) ज्या गावसमुहांच्या लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 50% पेक्षा थोडे कमी आहे त्यांचाही सुधारित निकषानुसार उपयोजनेत समावेश करण्यात आला अशा पध्दतीने काढण्यात आलेल्या क्षेत्राला ''अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र'' असे म्हणतात. महाराष्ट्रातील रायगड, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, पुणे या जिल्हयांमधील 1,267 गावांचा अतिरिक्त उपयोजना क्षेत्रात समावेश करण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील संवर्गनिहाय गावे / शहरे आणि क्षेत्रफळ**

| अ. नं. | संवर्ग | समाविष्ट क्षेत्र | | | व्याप्ती क्षेत्र | | तालुक्यांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जिल्हे | ए.वि.प्र. | तालुके | गावे/शहरे | क्षेत्र (चौ.कि.मी.) | पूर्णतः | अंशतः |
| | ग्रामीण क्षेत्र | | | | | | | |
| 1 | टी.एस.पी. | 12 | 18 | 59 | 5881 | 44396 | 23 | 39 |
| 2 | ए.टी.एस.पी. | 10 | 12 | 24 | 1267 | 5015 | - | 24 |
| 3 | माडा व मिनी माडा पॉकेटस् | 17 | 16 | 47 | 1251 | 9492 | - | 47 |
| | एकूण ग्रामीण नागरी क्षेत्र | 21 | 22 | 130 | 8399 | 58903 | 23 | 107 |
| 4 | टी.एस.पी. शहरे | 08 | 10 | 17 | 29 | 2029 | 11 | 18 |
| | ग्रामीण व नागरी | 21 | 24 | 130 | 8399(29) | 60932 | 23 | 107 |
| 5 | बिगर आदिवासी क्षेत्र | 14 | 02 | 223 | 35313(349) | 246781 | - | - |
| | एकूण राज्य | 35 | 24 | 353 | 4371(378) | 307713 | 23 | 107 |

संदर्भ- आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, वार्षिक आदिवासी उपयोजना 2008-09. पृ.460.

टीप-

1. संवर्गनिहाय आदिवासी उपयोजना, ए.टी.एस.पी, माडा मिनी क्षेत्र एकापेक्षा जास्त जिल्हे व प्रकल्प क्षेत्रात येत असल्याने रकाना 3 ते 5 ची बेरीज जुळत नाही.
2. रकाना क्र. 10 व 11 मधील तालुक्यांच्या संख्येत शहरांचाही समावेश आहे.
3. कंसातील आकडे शहरांची संख्या दर्शवतात.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – III October 2014

तकत्यानुसार महराष्टातील आदिवासी उपयोजना संवर्गनिहाय जिल्हे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तालुके आणि गावे/ शहरांची माहिती मिळते. महाराष्ट्रात आदिवासी उपयोजने अंतर्गत सर्व संवर्गाचा विचार करता 21 जिल्हे, 24 एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, 130 तालुके, 8,399 गावे आणि 29 शहरांचा समावेश असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी 60,932 चौ. कि. मी. भूक्षेत्र ही आदिवासी उपयोजनेची व्याप्ती आहे. आदिवासी उपयोजनेबाहेर 14 जिल्हे , 2 एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, 223 तालुके, 35,313 गावे आणि 349 शहरे असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या 3,07,713 चौ. कि. मी. भू-क्षेत्रापैकी आदिवासी उपयोजनेबाहेरील भूक्षेत्र 2,46,781 चौ. कि.मी. आहे. मुंबईतील गोरेगाव आणि माडिया गोंड या आदिम जमातीसाठीचा गडचिरोली जिल्हयातील भामरागड हे दोन आदिवासी विकास प्रकल्प उपयोजना क्षेत्राबाहेरील आहेत.

आदिवासी उपयोजने अंतर्गत 12 जिल्हे, 18 एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, 59 तालुके, 5,881 गावे यांचा समावेश असून उपयोजने अंतर्गतचे भूक्षेत्र 44,396 चौ. कि. मी. आहे. आदिवासी उपयोजनेत 59 तालुक्यापैंकी 23 तालुक्यांचा पूर्णतः तर 39 तालुक्यांचा अंशतः समावेश आहे. अतिरिक्त आदिवासी उपयोजने अंतर्गत 10 जिल्हे, 12 एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, 24 तालुके आणि 1,267 गावांचा समावेश असून भूक्षेत्राचा प्रमाण 5,015 चौ. कि. मी. आहे. माटा व मिनीमाडा क्षेत्रांतर्गत 17 जिल्हे, 16 एकात्मिक आदिवासी आदिवासी विकास प्रकल्प, 47 तालुके आणि 1,251 गावांचा समावेश असून या संवर्गातर्गतचे भूक्षेत्र 9,492 चौ. कि. मी. आहे.

**महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील लोकसंख्या**

| अ.नं. | संवर्ग | लोकसंख्या (लाख) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | उपयोजना क्षेत्र | 35.70 | 41.62 |
| 2 | माडा क्षेत्र | 4.70 | 5.47 |
| 3 | मिनी माडा क्षेत्र | 1.14 | 1.32 |
| 4 | अतिरिक्त उपयोजना क्षेत्र | 1.44 | 1.67 |
| 5 | एकूण उपयोजना क्षेत्र | 42.98 | 50.08 |
| 6 | उपयोजना बाहय क्षेत्र | 42.79 | 49.92 |
| | एकूण | 85.77 | 100.00 |

संदर्भ- आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, वार्षिक आदिवासी उपयोजना-2008-09, पृ. 56.

2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्या 85.75 लाख आहे. महाराष्ट्रात आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्या 42.98 लाख असून या क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 50.08% आहे. अपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासी लोकसंख्या 42.79 लाख असून या क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 49.92% आहे.

**महाराष्ट्रातील योजनाकालीन आदिवासी उपयोजना खर्च**

महाराष्ट्रात योजनाकाळात आदिवासी उपयोजनेसाठीचा नियतव्यय खालीलप्रमाणे आहे.

**महाराष्ट्रातील योजना व आदिवासी उपयोजना नियतव्यय**

| योजना/ कालखंड | महाराष्ट्र योजना (लाख रू.) | आदिवासी उपयोजना (लाख रू.) | उपयोजना टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 5 वी योजना | 2,62,727.00 | 12,499.00 | 4.75 |
| 6 वी योजना | 6,53,724.00 | 34,111.00 | 5.22 |
| 7 वी योजना | 10,50,000.00 | 52,500.00 | 5.00 |
| 1985-86 | 1,70,000.00 | 8,245.00 | 4.85 |
| 1986-87 | 2,10,000.00 | 11,350.00 | 5.38 |
| 1987-88 | 2,32,000.00 | 14,546.00 | 6.42 |
| 1988-89 | 2,43,000.00 | 17,004.00 | 8.06 |
| 1989-90 | 2,64,000.00 | 17,491.00 | 6.42 |
| 1990-91 | 2,52,188.00 | 16,988.00 | 6.71 |
| 1991-92 | 3,00,000.00 | 20,086.00 | 6.64 |
| 1992-93 | 3,16,000.00 | 22,239.05 | 7.04 |
| 1993-94 | 3,80,400,.00 | 26,500.00 | 6.97 |
| 1994-95 | 4,40,000.00 | 33,000.00 | 7.50 |
| 1995-96 | 5,50,000.00 | 41,250.00 | 7.50 |
| 1996-97 | 7,87,100.00 | 58,857.87 | 7.48 |
| 1997-98 | 8,32,500.00 | 55,000.00 | 6.60 |
| 1998-99 | 6,40,000.00 | 56,100.00 | 8.76 |
| 1999-00 | 6,64,182.00 | 58,059.00 | 8.74 |
| 2000-01 | 5,79,800.00 | 52,500.00 | 9.05 |
| 2001-02 | 6,75,000.00 | 5,66,700.00 | 9.05 |

| योजना/ कालखंड | महाराष्ट्र योजना (लाख रू.) | आदिवासी उपयोजना (लाख रू.) | उपयोजना टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 2002-03 | 5,70,404.00 | 58,500.00 | 10.26 |
| 2003-04 | 7,57,838.00 | 55,573.00 | 7.33 |
| 2004-05 | 9,44,673.00 | 53,004.00 | 5.61 |
| 2005-06 | 11,00,000.00 | 99,000.00 | 9.00 |
| 2006-07 | 14,82,900.00 | 1,38,900.00 | 9.36 |
| 2007-08 | 20,20,000.00 | 1,79,800.00 | 8.90 |
| 2008-09 | 25,00,000.00 | 1,94,150.00 | 7.77 |

संदर्भ - आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, वार्षिक आदिवासी उपयोजना- 2008-09, पृ. 487.

महाराष्ट्रात पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून आदिवासी उपयोजनेची सुरुवात झाली तेव्हा 2,62,757 लाख रू. राज्य योजनेपैकी आदिवासी उपयोजनेसाठी 12,499 लाख रू. उपलब्ध करून देण्यात आले. या 5 व्या योजनाकाळात आदिवासी उपयोजनेसाठीच्या खर्चाची टक्केवारी 4.75 होती.

1986-87 पासून राज्यात आदिवासी उपयोजनेच्या विस्तारास चालना देण्याच्या हेतूने मांडा आणि मिनीमाडा प्रकल्पांची सुरुवात झाली. सुकथनकर उपसमितीच्या शिफारसीनुसार राज्य योजनेच्या 9% खर्च आदिवासी उपयोजनेवर करण्याचे शासनाने मान्य केल्याने 1993-94 पासून उपयोजनाविषयक खर्चात लक्षणीय वृध्दी करण्यात आली. महाराष्ट्रात आदिवासी उपयोजनेवरील खर्च 1993-94 ते 1999-2000 या काळात राज्य योजनेच्या 7% ते 9% च्या दरम्यान असल्याचे आकडेवारीवरुन स्पष्ट होते. 2000-2001 ते 2004 ते 2005 या काळात आदिवासी उपयोजनेवरील खर्चाचे प्रमाण घटून ते 4 ते 5 % च्या दरम्यान राहिल्याचे स्पष्ट होते. 2005-06 ते 2007-08 या तीन वर्षाचा विचार करता योजना काळात निश्चित सूत्रानुसार आदिवासी उपयोजना खर्च 9% राहिल्याचे दिसते. थोडक्यात महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकासाच्या दृष्टीने उपयोजनेच्या माध्यमातून प्रयत्न केले असून अपेक्षित यशस्वीतेसाठी अलिकडील काळातील कामगिरी पहाता अशा प्रयत्नांची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील आदिवासी विकासचे उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या दृष्टीने आदिवासी उपयोजनेची संख्यात्मक व गुणात्मक वृध्दी अपेक्षित आहे.

**सारांश**

महाराष्ट्रातील आदिवासींची आर्थिक व सामाजिक प्रगती आणि जीवनमान वृध्दीच्या दृष्टीने प्रचलित आदिवासी उपयोजनेची अंमलबजावणी 1975-76 होत आहे. प्रारंभी 'क्षेत्र विकासाच्या' संकल्पनेवर आधारित आदिवासी उपयोजनेच्या संदर्भात 1986 पासून ''आदिवासी कुटंबांचा विकास'' हा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे. राज्यातील आदिवासींच्या रहाणीमानात सुधारणा करणे, त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे आणि आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक विकास प्रकियेला गती देणे या प्रमुख उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या दृष्टीने आदिवासी उपयोजनेची अंमलबजावणी केली जात आहे. महाराष्ट्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांची संख्या 24 असून माडा व मिनी माडा प्रकल्प अनुक्रमे 44 त 24 इतके आहेत. महाराष्ट्र महाराष्ट्रातील कातकरी, माडिया गोंड व कोलाम हे तीन आदिम समूह आहेत. सुकथनकर उपसमितीच्या शिफारशीनुसार आदिवासी उपयोजनेसाठी राज्ययोजनेच्या 9% निधी उपलब्ध करुन दिल्याचे मान्य करण्यात आले आहे. 1993-94 पासून आदिवासी उपयोजनेच्या नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी विभागाच्या माध्यमातून मंत्रालयीन ते क्षेत्रीय स्तर अशी व्यापक प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहे. आदिवासी उपयोजनेसाठीच्या निधीचा विनियोग जिल्हास्तरीय योजनांसाठी 60% तर राज्यस्तरीय योजनांसाठी 40% असा केला जातो. राज्यस्तरीय योजनेपैकी उपयोजना क्षेत्रासाठी 85% तर उपयोजना बाहय क्षेत्रासाठी 15% असा निधी निश्चित करण्यात आलेला आहे. जिल्हास्तरीय योजनेत मूलभूत सुविधांवर 80 तर वैयक्तिक लाभ योजनांवर 20 व्यय करण्याचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. आदिवासी क्षेत्र व आदिवासी कुटुंबाला केंद्रस्थानी मानून आदिवासी विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी शासकीय चौकटीत 9 मुख्य शीर्ष आणि 31 उपशीर्षाच्या माध्यमातून केली जात आहेत.

5 व्या पंचवार्षिक योजनेपासून आदिवासी उपयेजनाविषयक अर्थसंकल्पीय तरतूद आणि प्रत्यक्ष झालेला खर्च यातील तफावत आदिवासी विकास प्रयत्नांवरील मर्यादा स्पष्ट करणारी आहे. महाराष्ट्रात आदिवासी विकासासाठी उपयोजनाविषयक खर्च वृध्दी व त्याचा विनियोग यादृष्टीने विशेष प्रयत्न होत असून त्यास गती देण्याची गरज आहे. राज्य व जिल्हास्तरीय योजनांसाठी आदिवासी उपयोजना व्यय निर्धारित सूत्रानुसार करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे. क्षेत्रीय व कौटुंबिक योजनांमध्ये

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – III October 2014

समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. राज्यात शिक्षण हे परिवर्तनाचे माध्यम मानून आदिवासी शिक्षणविषयक योजनांची राबवणूक केली जात आहे.

## संदर्भ सूची

1. आदिवासी विकास विभाग = ''आदिवासी विकास परिचय पुस्तिका'', महाराष्ट्र शासन, 2003-04
2. आदिवासी विकास विभाग = ''नागरिकांची सनद'', महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, डिसेंबर 2006.
3. गारे गोविंद ;
   - ''आदिवासी प्रश्न'', आदिम प्रकाशन, पुणे, 1976
   - ''आदिवासी समस्या विचार आणि विश्लेषण'', आदिवासी समाजविज्ञान संस्था, नाशिक, 1976
   - ''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती 2002.
4. वर्मा आर. सी. : मराठी अनुवाद - क्षीरसागर मनोज वामन ''भारतीय जमाती काल, आज आणि उद्या'' प्रकाशन विभाग, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, प्रथम आवृत्ती 2003.
5. Jain Navinchandra, Tribhuwan Robin; (Edited) "An Overview of Tribal Research Studies," TR&TI, Pune, 1995

Websites :
1. http://www.censusindia.net/
2. http://www.maharashtra.gov.in/
3. http://www.mahatribal.gov.in/
4. http://www.msctdc.gov.in/
5. http://www.nashik.nic.in/
6. http://www.tribal.nic.in/
7. http://www.trti.mah.nic.in/